castrol.co.in

2 June 2025

To

**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400 001
**Scrip Code: 500870**

**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400 051
**Symbol : CASTROLIND**

Dear Sir/Madam,

**Subject: Newspaper Advertisement for Transfer of Equity Shares of the Company to Investor Education and Protection Fund (IEPF) Authority**

Please find enclosed the copies of the newspaper advertisement of the Notice to the Equity Shareholders of the Company, published on 2 June 2025 in the following newspapers:

1. Financial Express (English)
2. Sakal (Marathi)

You are requested to take above information on record.

Yours faithfully,
**For Castrol India Limited**

HEMANGI YATEEN GHAG
Digitally signed by HEMANGI YATEEN GHAG
Date: 2025.06.02 20:23:12 +05'30'

**Hemangi Ghag**
**Company Secretary & Compliance Officer**
**Membership No: FCS 9329**

# खुल्या प्रवर्गासाठीचे 'अमृत'

**खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक युवतींसाठी शैक्षणिक, स्पर्धा परीक्षा, प्रशिक्षण आणि व्यवसाय उभारणी अशा विविध विषयांच्या माध्यमातून साहाय्य मिळण्याच्या दृष्टीने राज्य सरकारच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या 'अमृत' या संस्थेच्या कार्याचा, योजनांचा घेतलेला आढावा..**

**अंकित काणे**

राज्यातील विविध समाज घटकांतील आर्थिक दुर्बल घटकांसाठी महाराष्ट्र सरकारच्या विविध योजना कार्यरत आहेत. पैशाअभावी विविध कौशल्ये आत्मसात करू न शकणारे तसेच आर्थिक भांडवल उपलब्ध नसल्याने व्यवसाय उभा करू न शकणारे असंख्य युवक-युवती हे खुल्या प्रवर्गात देखील आहेत. ही अडचण ओळखून महाराष्ट्र शासनाने खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी, तरुणांसाठी एका संस्थेची स्थापना केली आहे. ती संस्था म्हणजे 'महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी' अर्थात 'अमृत...' ही संस्था राज्य शासनाची स्वायत्त संस्था असून ती 'इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालया'शी संलग्न आहे. या योजनेअंतर्गत खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही शासकीय अथवा महामंडळाच्या माध्यमातून कुठलेही लाभ मिळत नाहीत अशा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक युवती याचा लाभ घेऊ शकतात. जातींचाच विचार करायचा झाला तर खुल्या प्रवर्गातील ब्राह्मण, कोमठी, सिंधी राजपूत, कायस्थ, सारस्वत, राजपुरोहित इ. अशा समाजातील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळू शकतो. अशा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून अनेक अभिनव प्रयोग 'अमृत' च्या माध्यमातून करण्यात येत आहेत. पुण्यातील औंध येथे या संस्थेचे सुसज्ज असे स्वतंत्र कार्यालय देखील स्थापन करण्यात आले आहे. 'अमृत' मार्फत निरनिराळ्या क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी विविध योजना आहेत, त्याची माहिती घेऊ..

### संपर्काचा तपशील

- **कार्यालय : पाचवा मजला, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे**
- **सर्व योजनांच्या माहितीसाठी वेबसाईट :** www.mahaamrut.org.in
- **संपर्क क्रमांक :** ०२० -२९९९९०९६, ९७३०१५१४५०
- **मेल :** info@mahaamrut.org.in

**स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन योजना :** संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) द्वारे देण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी लाभार्थी विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या - मुलाखतींच्या पूर्व तयारीसाठी रु. ५०,००० पर्यंतचे आर्थिक साहाय्य तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) द्वारे देण्यात येणाऱ्या विविध परीक्षांसाठी १५,००० पर्यंतचे आर्थिक साहाय्य 'अमृत'तर्फे मिळण्याची तरतूद.

**शैक्षणिक विकास योजना :** IIT, IIM, AIIMS अशा संस्थांमध्ये दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी 'अमृत'तर्फे शिक्षण पूर्ण होई पर्यंत विद्यार्थ्यांना रु. १०,००० प्रति महिना अर्थसहाय्य अमृत तर्फे देण्याची तरतूद.

**प्रशिक्षण योजना :** या योजनेअंतर्गत 'आयात निर्यात', 'स्वयंरोजगार व उद्योजकता विकास', 'सूर्यमित्र', 'आर्थिक साक्षरता', 'कृषी उद्योग', 'बेकरी प्रशिक्षण' अशा विविध विषयांचे विनामूल्य प्रशिक्षण अमृत योजनेतर्फे उपलब्ध.. यासाठी 'महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र'सोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच सध्या संगणकाचे महत्व लक्षात घेता 'अमृत कलश योजने'अंतर्गत युवा व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण, संगणक कौशल्य, इंग्रजी प्रशिक्षण वर्ग व विविध भाषांवरील प्रभुत्व असे कार्यक्रम राबवले जातात.

**अमृत कर्ज व्याज परतावा योजना :** खुल्या प्रवर्गातील व्यवसाय करण्यास इच्छूक असणाऱ्या युवकांनी बँकेकडून व्यवसायासाठी रु. १५ लाखांपर्यंतचे कर्ज घेतल्यास त्याच्या व्याजाचा परतावा संबंधित व्यक्तीच्या बँक खात्यात तीन महिन्यांच्या आत 'अमृत'तर्फे जमा केला जाईल. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्यासोबत सामंजस्य करार करून टायपिंग व लघु लेखनासाठी अर्थ साहाय्य योजना राबवण्यात येते. या महत्वाच्या योजना तसेच इतर काही छोट्या योजना व प्रशिक्षण हे अमृत च्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. या व इतर योजनांची सविस्तर माहिती संस्थेच्या खाली दिलेल्या वेबसाईट वर उपलब्ध आहे. या योजना गावोगावी पोहोचवण्यासाठी 'अमृत मित्र' प्रचारकांची भूमिका पार पाडत आहेत तसेच प्रशिक्षणासाठी असंख्य तज्ज्ञ प्रशिक्षक 'स्वयंसेवकाच्या' भूमिकेतून 'अमृत'ला सहकार्य करीत आहेत. अशा विविध योजनांच्या माध्यमातून 'अमृत' संस्था ही खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांसाठी अमृत ठरेल असे आशादायी चित्र वाटते.

आर्थिक दुर्बल घटकांच्या अडचणी दूर होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आपले शासन कायम कार्यरत आहे. त्या दृष्टीने खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, कौशल्य विकासाबाबतच्या अडचणींचे निरसन व्हावे, विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ मिळावे याद्दष्टीने शासनाने 'अमृत' संस्था कार्यान्वित केली आहे. या संस्थेला लागणाऱ्या पायाभूत सुविधा व निधी याची कमतरता आम्ही पडू देणार नाही. या 'अमृत' संस्थेचा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना योग्य तो लाभ होईल याची मला खात्री आहे.
- **अतुल सावे** ( कॅबिनेट मंत्री )

'अमृत' संस्था ही अतिशय सक्षमपणे काम करत आहे. या संस्थेचा कार्यविस्तार तसेच योजना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचाव्या असा आमचा प्रयत्न आहे. आमच्या लक्षित गटातील सर्वांना यानिमित्ताने मी माझ्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने "आम्ही आहोत" हा विश्वास देऊ इच्छितो. तेव्हा दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधा आणि आम्ही सर्वतोपरी तुमच्यासाठी उपलब्ध आहोत!
- **विजय जोशी** ( व्यवस्थापकीय संचालक, 'अमृत'

# 'पीओके'बाबतच चर्चा करा : अभिषेक बॅनर्जी

क्वालालंपूर, ता. १ : भारताने पाकिस्तानबरोबर पुढील चर्चा केवळ पाकव्याप्त काश्मीरवर ताबा मिळविण्याबाबतच करायला हवी, असे मत तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी आज व्यक्त केले. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर विविध देशांमध्ये भारताची भूमिका मांडण्यासाठी नेमलेल्या शिष्टमंडळामध्ये बॅनर्जी यांचा समावेश आहे. त्यांच्या शिष्टमंडळाने आज मलेशिया येथे भारतीय समुदायाबरोबर चर्चा केली. यावेळी बॅनर्जी म्हणाले, आपण पाकिस्तानबरोबर अनेक दशके चर्चा केली, आता त्यांच्या ताब्यातील जम्मू-काश्मीरचा भाग परत मिळविण्याबाबतच चर्चा करावी.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that on behalf of my clients, we are investigating the title of M/s. Dossabhoy & Dossabhoy, a Partnership Firm registered under the provisions of the Indian Partnership Act, 1932 represented by their Partners 1) Nasswan Sorab Dossabhoy, 2) Navaz Sam Engineer & 3) Zal Sam Cooper (hereinafter referred to as 'the said Owners') to the property more particularly described in the Schedule hereunder written(hereinafter referred to as "the said Property). My clients are in negotiations with M/s. Dossabhoy & Dossabhoy to purchase the said property.

Any person or persons having any claim, demand or share in respect of the said property or any part thereof either by way of sale, lease, sub-lease, tenancy, leave and license, development right, mortgage, charge, lien, gift, exchange, release, trust, maintenance, bequest, inheritance, possession, occupation, Memorandum of Understanding, arrangement, easement, beneficial interest or otherwise howsoever, are hereby requested to make the same known in writing to the undersigned at his office at 103, Shree Sadan, Phadke Lane, Brahman Society, Naupada, Thane - 400 602 within a period of 14 days from the date of publication of this notice together with supporting documents duly notarized as true copy, failing which, claims and/or demand if any, shall be deemed to have been waived and/or abandoned.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO :**

ALL THAT piece and parcel of the land bearing City Survey No. 163 admeasuring 1 H-31 R-00 P equivalent to 13,100 sq.mtrs. together with Race View Hotel standing thereon situate at Village Mahabaleshwar, Taluka Mahabaleshwar & District Satara and bounded as follows :

On or towards East : City Survey No. 191A
On or towards West : Public Road
On or towards South : City Survey No. 184 and 185
On or towards North : Public Road

Date : 02.06.2025

Sd/-
**Adv. Vishwas M. Kulkarni**


# 'सामना' चित्रपटाचे भारलेले दिवस

**तत्कालीन राजकीय-सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारा 'सामना' चित्रपट आजही कालसुसंगत वाटतो. वास्तवाचे भेदक चित्रण करणाऱ्या या चित्रपटास आज ( ता. २ जून) पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने दिग्दर्शकाने नमूद केलेल्या आठवणी.**

**डॉ. जब्बार पटेल**


'सामना' चित्रपटातील दृश्यात डॉ. श्रीराम लागू व निळू फुले.

डॉ. श्रीराम लागू आणि निळू फुले या अभिनेत्यांना डोळ्यासमोर ठेवून एखाद्या चित्रपट तयार करता येईल का, असा विचार रामदास फुटाणे यांच्या मनात आला. त्यातून 'सामना'ची गोष्ट विजय तेंडुलकरांच्या मनात तयार झाली आणि त्यांनी संहिता लिहिली. हे सर्व होत असताना दिग्दर्शन कोण करणार, हे ठरलं नव्हतं. तेंडुलकर आणि रामदास फुटाणे यांच्यामध्ये काय बोलणं झालं ते मला माहिती नाही. रामदासचा मला फोन आला, 'जब्बार, आपण भेटू या. एक संहिता तयार आहे. तू हा चित्रपट दिग्दर्शित करावास असं मला वाटतं.' मी म्हटलं, 'मला काही अनुभव नाही. मी सिनेमा केला नाही कधी.' त्याने माझं 'घाशीराम कोतवाल'चं काम पाहिलं होतं. तो म्हणाला, की ''घाशीराम कोतवाल हे जे प्रोडक्शन आहे ते थिएटरमध्ये नाटक पाहिलं. त्यामध्ये एक ताल आहे, लय आहे आणि त्याला एक अतिशय दृश्यात्मक अशी झाक आहे.''

रामदासला पैशांची अडचण होती. कुठूनतरी पैशाची जुळवाजुळव करायची आणि नंतर शूटिंग करायचं, असं होतं ते. मला कळत होतं, की ते सगळं तो धडपडून करतोय. दोन मातब्बर नट असल्यामुळं तालमी फार कराव्या लागल्या नाहीत. त्यामुळं फार फिल्म वाया नाही गेली. दोन रिहर्सल झाल्या, की तो शॉट पटकन व्हायचा. विशेष म्हणजे मला, कॅमेरा कोणावर असणार आहे, हे त्यांनी कधीही सांगितलेलं नव्हतं. प्रामाणिकपणे तुला जी फिल्म करायची ती कर, असं म्हणणं रामदासचं विशेष होतं. पण गंमत अशी, की जवळजवळ त्या सिनेमामध्ये ९ मिनिटं, ११ मिनिटं आणि ७ मिनिटं अशी होती, ती फक्त दोनच अभिनेत्यांवर होती. हे फार मोठं आव्हान होतं. मी म्हटलं, ''रामदास, हे सगळं गद्यमय होतंय. नाटकासारखं आहे. त्यामुळं त्याला कुठेतरी एक संगीताचा एक वेगळा भाग घ्यायला पाहिजे.'' रामदास म्हणाला, ''तेंडुलकरांनी संहितेत तर काही लिहिलं नाही.'' तेंडुलकरांना मी म्हटलं की '' मास्तरांच्या कॅरेक्टरचं जे मन आहे ते सांगणारं पार्श्वगीत मला हवंय. ते मास्तरांच्यावर राहील.'' त्यांनी म्हटलं, ''मला काही पटत नाही. तू बघ काय करायचं आहे ते.'' मला दौंडला स्टेशनला जायचं होतं. दिवाळी होती. काही दिवाळी अंक आले होते. अंक चाळत असताना 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' ही मुक्तछंदातली कविता निवडली. आरती प्रभू यांची म्हणजे चि. त्र्यं. खानोलकर यांची ती कविता होती. भास्कर चंदावरकर संगीतकार म्हणून काम करायचे. मला वाटलं ही कविता चित्रपटातील मास्तरांच्या मनोगताशी जुळते आहे. मी त्यांना फोन केला. ते म्हणाले, ''तुला आवडली का? तू घेऊन टाक.'' मग ते गाणं झालं. मला असं वाटलं की जसं मास्तरांचं मनोगतच या गाण्यातून आलंय.

सिनेमा सुरुवातीला लागला, त्या वेळेला लोकांना वाटलं की वेगळा सिनेमा आहे. फार मोठं स्वागत झालं नाही. तेवढ्यात हा सिनेमा बर्लिनला स्पर्धेमध्ये निवडला गेला. तिथं पहिला मराठी सिनेमा स्पर्धेत गेला. रामदासनं खूप धडपड केली की जायला पाहिजे तिकडं बर्लिनला. सुशीलकुमार शिंदे हे सांस्कृतिक खात्याचे मंत्री होते. त्यांच्या मदतीनं एअर इंडियाची तिकिटं रामदासनं मिळवली. रामदासनं धडपड केली. डॉ. लागू, मी, निळूभाऊ, रामदास आणि इतर दोघे, असे आम्ही पाच लोकं गेलो बर्लिनला. अशा पद्धतीनं रामदासनं विक्रम केला. आम्ही जामखेडला शूटिंग केलं. त्याच्या गावी निळूभाऊ आले होते आणि 'जयप्रभा'मध्ये शूटिंग झालं. रामदासच्या मनामध्ये जो निर्धार होता, तो त्यांनी केला. त्यांना कल्पनाही नव्हती, की मराठीत इतका वेगळा सिनेमा होईल आणि त्यांच्या या सिनेमामुळं एक वेगळी दिशा मिळू शकते. बर्लिनला जाणं, त्याचं संगीत गाजणं इतक्या गोष्टीत रामदासचं श्रेय आहे. माझ्या आयुष्यात सिनेमाची वाट दाखवणारा रामदास हा जिवलग मित्र आहे. त्याला आठवण आली, की तो फोन करतो आणि आम्ही बोलतो. राजकीय विचार आमचे जवळजवळ सारखे आहेत.

रामदासची आठवण म्हणजे अशी, की तो सतत धडपडत होता. गंमत अशी, की मला ज्या पद्धतीनं सिनेमा करायचा होता, त्याच्यात तो एकाही क्षणी माझ्या आड नाही आला. एकच लक्षात ठेव, फार खर्च करू नकोस, एवढंच त्याचं म्हणणं. रामदासची अडचण आम्हा दोघांनाही माहीत होती. त्यामुळं निळूभाऊ आणि डॉ. लागू या दोघांनीही अपेक्षा नाही केली. आम्ही कोणीही 'सामना' पैशासाठी केलाय असं वाटलं नाही. अजूनही माझे इतके सिनेमे झाले; पण लोकांना विचारलं, की तुमचा सर्वात आवडता सिनेमा कोणता, तर 'सामना' असं म्हणतात. काही लोकांना 'उंबरठा' आवडतो, काही लोकांना 'डॉ. आंबेडकर' आवडतो; पण या सगळ्या माझ्या प्रवासात रामदास माझ्याबरोबर कायम राहिला. यानिमित्तानं डॉ. लागू आणि निळूभाऊ यांच्याजवळ जाता आलं. त्यांना समजून घेता आलं. त्या दोघांचे विचार म्हणजे सौंदर्यात्मक, राजकीय, सामाजिक विचार होते. रामदास सोबत असायचा. या सिनेमाचा माझ्या मनावर मोठा परिणाम झाला. 'सामना'च्या यशात डॉ.लागू आणि निळूभाऊंचं मोठं श्रेय आहे. चंदावरकर यांचंही श्रेय आहे; परंतु सगळ्यात मोठा वाटा हा रामदास फुटाणे यांचा आहे असं मी मानतो. विजय तेंडुलकरांचं स्क्रीप्ट हा तर चित्रपटाचा प्राणच. आम्ही सगळे कृतज्ञ आहोत, की तेंडुलकरांनी इतकं सुंदर स्क्रीप्ट लिहिलं.

### सहकाराला ग्रासणारा भ्रष्टाचार

'सामना'मध्ये त्या वेळेला सुरू झालेल्या भ्रष्टाचाराची एक झलक आहे. या देशात स्वातंत्र्यानंतर हळूहळू भ्रष्टाचारानं तोंड काढायला सुरुवात केली आणि ती पहिल्यांदा सहकारामध्ये कशी आली, त्याचं एक विदारक चित्र हे या सिनेमानं दिलं. बाकीचे सिनेमे हे भारताच्या दारिद्र्याबद्दलचे होते. देशामध्ये भ्रष्टाचार व्हायला लागला आहे, हे ठळकपणे सांगणारा हा चित्रपट आला. रामदासची विचारधारा या सगळ्या प्रकारामध्ये येते. मला जे काही करता आलं, याचं श्रेय 'सामना'ला आहे. अन्यथा, पुढे मी फार काही करू शकलो नसतो. मी काही फिल्म इन्स्टिट्यूटचा विद्यार्थी नाही. मेडिकलचा विद्यार्थी आहे, पण रामदासच्या डोक्यात हे येणं विशेष होतं. त्यामुळं या सिनेमानं दोन गोष्टी साधल्या. 'मारुती कांबळेंचं काय झालं?' बऱ्याच अग्रलेखांचं शीर्षक असतं 'मारुती कांबळेंचं काय झालं.' तसंच 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' हेसुद्धा अग्रलेखाचं शीर्षक असतं. 'या टोपीखाली दडलंय काय' या नावाने नाटकपण येऊन गेलंय. रामदास चित्रकार असल्यानं रंगांचं, आकाराचं महत्त्व कळतं आणि मुख्य म्हणजे साहित्याची आणि मराठी कवितेची प्रचंड आवड आहे. त्याची साहित्याची आवड, कवितेचं आणि त्याचं नातं, यामुळं त्याच्या विचारांचा दर्जा उच्च आहे. समाजभान जिवंत आहे. या त्याच्या सगळ्या केमिस्ट्रीमुळेच 'सामना' सर्वोत्कृष्ट झाला.

**('कवितेच्या 'नाना' कळा' या पुस्तकातील 'सामना'चे दिवस' या लेखाचा संपादित अंश साभार.)**


**Castrol**

**कॅस्ट्रॉल इंडिया लिमिटेड**

**सीआयएन :** L23200MH1979PLC021359
नोंदणीकृत कार्यालय : टेक्नोपोलीस नॉलेज पार्क, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०९३
वेबसाइट : www.castrol.co.in
दूर. : +९१ २२ ७१७७ ७१११ फॅक्स : +९१ २२ ६६९८ ४१०१
ई-मेल : investorrelations.india@castrol.com

**सूचना**

**(कंपनीच्या समभाग धारकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी)**

कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') च्या अनुच्छेद १२४ च्या तरतुदी सहवाचन गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकारी (लेखा, लेखापरीक्षण, स्थानांतरण व परतावा) नियम, २०१६ (नियम), सुधारित केल्यानुसार, यांअंतर्गत सूचना देण्यात येत आहे की, भागधारकांकडून लागोपाठ सात वर्षांच्या कालावधीकरिता अप्रदानित/दावारहित राहिलेल्या लाभांशासंदर्भातील सर्व शेअर्सचे कंपनीला गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) खात्यामध्ये स्थानांतरण करणे आवश्यक आहे.

सदर नियमांच्या आवश्यकतेअंतर्गत, ज्या भागधारकांचे शेअर्स व सन २०१८ व तत्पश्चातच्या कालावधीकरिताचे लाभांश अप्रदानित/दावारहित आहेत जे आयईपीएफ खात्याम ध्ये स्थानांतरित करण्यात यावयाचे आहेत अशा संबंधित भागधारकांना कंपनीने योग्य ती कृती करण्यासाठी व्यक्तिगत पत्रव्यवहार पाठवलेला आहे. अशा भागधारकांचा तपशील आपली वेबसाइट www.castrol.co.in वरही अपलोड करण्याच्या प्रक्रियेत कंपनी आहे.

अशा सर्व भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की त्यांनी दि. ०२.०९.२०२५ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत कंपनी/रजिस्ट्रार यांच्याकडे दि. ३१.१२.२०१८ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता व तत्पश्चातच्या कालावधीकरिताच्या अप्रदानित अंतिम लाभांशाचा दावा करणाऱ्या विनंतीसमवेत अर्ज करावा जेणेकरून अप्रदानित/दावारहित लाभांश व शेअर्स आयईपीएफकडे स्थानांतरित करण्यात येणार नाहीत. याचीही नोंद घ्यावी की कंपनी वा रजिस्ट्रार यांच्याद्वारे दि. ०२.०९.२०२५ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत कोणताही प्रतिसाद वा दावा प्राप्त न झाल्यास पुढील कोणतीही सूचना न देता कंपनीला असे अप्रदानित लाभांश व शेअर्सचे आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे स्थानांतरण करणे भाग ठरेल.

संबंधित भागधारकांनी नोंद घ्यावी की, दोन्ही आयईपीएफकडे स्थानांतरित अप्रदानित/दावारहित लाभांश व शेअर्स तसेच अशा शेअर्सवरउद्भवलेले सर्व लाभ, काही असल्यास, यांकरिता नियम ांतर्गत विहित प्रक्रियेचे पालन करून आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडून पुन्हा दावा करता येऊ शकेल. भागधारकांनी नोंद घ्यावी की, नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे स्थानांतरित दावारहित लाभांश रक्कम व शेअर्ससंदर्भात कंपनीविरोधात कोणताही दावा करता येणार नाही.

कागदोपत्री स्वरूपातील भागधारक असलेल्या भागधारकांनी भविष्यात सीक्युरिटीजच्या विनाअडथळा हस्तांतरणाकरिता कृपया कंपनीतील त्यांचे शेअर्स डीमटेरियलाइज्ड करावेत.

सदर प्रकरणी भागधारकांना काही प्रश्न असल्यास त्यांनी कंपनीचे आरटीए - केफिन टेक्नॉलॉजीस लिमिटेड, युनिट : कॅस्ट्रॉल इंडिया लिमिटेड, सेलेनियम टॉवर - बी, प्लॉट क्र. ३१ - ३२, गाचीबोवली, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानक्रमगुडा, हैदराबाद - ५०० ०३२, टोल फ्री क्र. : १८०० ३०९४ ००१, ईमेल einward.ris@kfintech.com येथे संपर्क साधावा.

**कॅस्ट्रॉल इंडिया लिमिटेड करिता**

**हेमांगी घाग**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०२.०६.२०२५**



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण विभाग

**ई - निविदा सूचना**

**ATC-EE-SITC-RTS-25-26**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त खालील दर्शविलेल्या कामाकरिता मोहोरबंद निविदा मागवीत आहेत :

| अ. क्र. | कामाचे वर्णन | इसारा रक्कम ठेव (इरठे) (रु.) | निविदा संदर्भ क्र. | प्रारंभ दिनांक | नियत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | बृहन्मुंबईच्या बेट शहरात पारंपरिक नवीन रस्ता वाहतूक सिग्नल सीस्टीमचा पुरवठा, प्रतिष्ठापन, चाचणी व क्रियान्वयन व तत्पश्चात १२ महिने क्षतिपूर्तता कालावधीपर्यंत प्रतिबंधात्मक व सुधारणात्मक देखभाल कार्य. | रु. ५,२३,०००/- | 2025_MCGM_1184241 | दि. ०२.०६.२०२५ | दि. १६.०६.२०२५ |
| २. | बृहन्मुंबईच्या पश्चिम उपनगरात पारंपरिक नवीन रस्ता वाहतूक सिग्नल सीस्टीमचा पुरवठा, प्रतिष्ठापन, चाचणी व क्रियान्वयन व तत्पश्चात १२ महिने क्षतिपूर्तता कालावधीपर्यंत प्रतिबंधात्मक व सुधारणात्मक देखभाल कार्य. | रु. २,९२,९००/- | 2025_MCGM_1183905 | दि. ०२.०६.२०२५ | दि. १६.०६.२०२५ |
| ३. | बृहन्मुंबईच्या पूर्व उपनगरात पारंपरिक नवीन रस्ता वाहतूक सिग्नल सीस्टीमचा पुरवठा, प्रतिष्ठापन, चाचणी व क्रियान्वयन व तत्पश्चात १२ महिने क्षतिपूर्तता कालावधीपर्यंत प्रतिबंधात्मक व सुधारणात्मक देखभाल कार्य. | रु. ५,२२,९००/- | 2025_MCGM_1183850 | दि. ०२.०६.२०२५ | दि. १६.०६.२०२५ |

पुढील तपशिलाकरिता लॉग ऑन करा: https://www.mahatenders.gov.in

**पीआरओ/५४१/जाहि. /२०२५-२६**

खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.
कुठेही पाणी साचू देऊ नका, डासांना निमंत्रण देऊ नका.

सही/- (२९.०५.२०२५)
**कार्यकारी अभियंता (एटीसी)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**



mahindra Rise

**महिन्द्रा अॅण्ड महिन्द्रा लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय:** गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबई - ४०० ००१.
कंपनी ओळख क्रमांक: एल्६५९९०एम्एच्१९४५पीएल्सी००४५५८
वेबसाइट: www.mahindra.com • ईमेल: investors@mahindra.com • टेलि.: +९१ २२ ६८९७५५००

**कंपनीच्या सामान्य (सम) भागधारकांना सूचना**

**विषय: कंपनीच्या सामान्य (सम) भागांचे/शेअर्सचे इन्व्हेस्टर एज्युकेशन अॅण्ड प्रोटेक्शन फंडामध्ये हस्तांतरण**

ही सूचना, कॉर्पोरेट कामकाज मंत्रालय यांच्या आदेशानुसार, इन्व्हेस्टर एज्युकेशन अॅण्ड प्रोटेक्शन फंड ऑथॉरिटी (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियम २०१६ च्या नियम ६(३) च्या कलम (ए), ज्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्यानुसार ("नियम"), प्रकाशित करण्यात येत आहे.

कंपनी कायदा २०१३ आणि नियमांमध्ये असे सगळे शेअर्स (भाग) ज्यांचा लाभांश भागधारकांनी सलग सात वर्षे किंवा त्याहूनही अधिक काळ वठविला नाही किंवा ज्याच्यासाठी दावा केला नाही किंवा त्यांना दिला नाही ते इन्व्हेस्टर एज्युकेशन अॅण्ड प्रोटेक्शन फंडाकडे ("आयइपीएफ") हस्तांतरित करण्याची तरतूद आहे. तथापि, कोर्ट किंवा ट्रिब्यूनल किंवा वैधानिक अधिकार असणारी संस्था यांनी असे शेअर्स (भाग) किंवा लाभांशाची रक्कम यांचे हस्तांतरण थांबविण्याचा खास आदेश दिला असेल तर किंवा डिपॉझिटरीज नियम, १९९६, मधील तरतुदींन्वये असे शेअर्स तारण ठेवले असतील तर किंवा गहाण ठेवले असतील तर कंपनी असे शेअर्स (भाग) आयइपीएफकडे हस्तांतरित करणार नाही.

नियमांमध्ये नमूद करण्यात आलेल्या विविध आवश्यकतांनुसार ज्यांचे सामान्य (सम) भाग, नियमांच्या अंतर्गत आयइपीएफ कडे हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा सर्व संबंधित भागधारकांना योग्य ती कार्यवाही करण्यासाठी वैयक्तिकरित्या पत्रव्यवहार केला आहे.

कंपनीने अशा सर्व भागधारकांचा संपूर्ण तपशील म्हणजे नाव, फोलिओ क्र. किंवा डीपी आयडी आणि क्लाएंट आयडी आणि शेअर्स जे आयइपीएफ प्राधिकारीकडे हस्तांतरित होणार आहेत त्यांचा संपूर्ण तपशील आपल्या वेबसाइटवर अपलोड केला आहे. संबंधित भागधारकांना अशी विनंती करण्यात येत आहे की त्यांनी https://www.mahindra.com/investor-relations/regulatory-filings ही वेबलिंक पहावी आणि न मिळालेल्या लाभांशांच्या तपशीलाची व आयइपीएफ प्राधिकारी डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरित होण्यासाठी पात्र असणारे समभाग यांचा सगळा तपशील तपासून घ्यावा.

कृपया ह्याची नोंद घ्यावी की या शेअर्सवर मिळणारे भविष्यातील सर्व लाभ, लाभांश हे सुध्दा आयइपीएफकडे जमा होतील. भागधारकांनी याचीही नोंद घ्यावी की असे न वठविलेले लाभांश आणि आयइपीएफ प्राधिकारीकडे हस्तांतरित झालेले सगळे शेअर्स आणि असल्यास ह्या लाभांवर जमा झालेले सर्व लाभ जे यामध्ये समाविष्ट आहेत ते सर्व नियमांमध्ये नमूद केलेल्या विहित प्रक्रियेचे पालन केल्यानंतर आयइपीएफ प्राधिकारीकडे परत मागता येऊ शकतात.

**संबंधित भागधारक ज्यांच्याकडे शेअर्स (भाग) भौतिक स्वरूपात आहेत आणि ज्यांचे शेअर्स आयइपीएफ प्राधिकारीकडे हस्तांतरित होण्यास पात्र आहेत त्यांनी याची नोंद घ्यावी की त्यांच्याकडे असणाऱ्या मूळ सर्टिफिकेट्सच्या/प्रमाणपत्रांच्या बदल्यात कंपनी नवीन भाग प्रमाणपत्रे/शेअर सर्टिफिकेट्स जारी करुन त्यानंतर, कंपनी कॉर्पोरेट प्रक्रियेद्वारा नियमांनुसार आयइपीएफकडे ही नवीन प्रमाणपत्रे डी मॅट स्वरूपात रूपांतरित करण्यासाठी आणि भाग हस्तांतरित करण्यासाठी डिपॉझिटरीला कळवील आणि या बाबतीत त्यांच्याकडे असणारी मूळ शेअर सर्टिफिकेट्स/भाग प्रमाणपत्रे जी त्यांच्या नावावर नोंदली गेली आहेत ती आपोआप रद्दबातल ठरतील आणि सौदा करण्यास पात्र मानली जाणार नाहीत. यापुढेही भागधारकांनी अशी नोंद घ्यावी की कंपनीच्या वेबसाइटवर अपलोड केलेला सगळा तपशील हा, नियमांना अनुसरून कंपनी जे आयइपीएफ प्राधिकारीकडे भाग/शेअर्स हस्तांतरित करणार आहे त्यासाठी जी नवीन शेअर सर्टिफिकेट्स/भाग प्रमाणपत्रे जारी करण्याच्या संदर्भात पुरेशी सूचना आहे आणि तो तसा मानला जावा.**

**डीमटेरियलाइज्ड स्वरूपात असलेल्या शेअर्सच्या बाबतीत कंपनी नियमांना अनुसरून आयइपीएफ प्राधिकारीकडे हस्तांतरित होणाऱ्या भागांच्या बाबतीत कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारा शेअर्स हस्तांतरित करण्यासाठी डिपॉझिटरींना कळवेल जिथे भागधारकांचे खाते असेल.**

**कृपया नोंद घ्यावी की २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी लाभांशांच्या रकमेसाठी दावा करण्याची अंतिम तारीख दि. ५ सप्टेंबर, २०२५ आहे.** सर्व संबंधित भागधारकांना अशी विनंती करण्यात येते की त्यांनी कंपनीकडे / कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजन्ट्स यांच्याकडे शक्यतो **दि. १८ ऑगस्ट, २०२५** पर्यंत, २०१७-१८ पासून पुढील कालावधीसाठी न वठविलेल्या किंवा दावा न केलेल्या लाभांशांसाठी दावा करण्याच्या विनंतीसह आपला अर्ज जरुर पाठवावा जेणेकरून कंपनीला अंतिम तारखेपूर्वी दाव्यांसंबंधी कार्यवाही करणे शक्य होईल.

संबंधित भागधारकांकडून अंतिम तारखेपर्यंत दावा न केलेल्या लाभांशाच्या बाबतीत कोणताही वैध दावा न केला गेल्यास कंपनी नियमांमध्ये नमूद केलेल्या आवश्यकतांना अनुसरून अंतिम तारखेस नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार शेअर्स आयइपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित करील. अशा वेळी कृपया याची नोंद घ्यावी की नियमांना अनुसरून आयइपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित केलेली न वठवली गेलेली लाभांशाची रक्कम आणि समभाग/इक्विटी शेअर्स यांच्या बाबतीत कंपनीकडे कोणताही दावा करता येणार नाही.

ह्या प्रकरणात कोणतीही माहिती/ स्पष्टीकरण हवे असेल तर संबंधित शेअरधारक/ दावेदार ह्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटस्, केफिन टेक्नोलॉजीस लिमिटेड यांच्याशी युनिट: महिन्द्रा अॅण्ड महिन्द्रा लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबौली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा - ५०० ०३२, भारत. येथे संपर्क साधावा. फोन: +९१ ४० ६७१६ २२२२; टोल फ्री क्र. १८०० ३०९४ ००१; ई-मेल: einward.ris@kfintech.com; वेबसाइट: www.kfintech.com

**महिन्द्रा अॅण्ड महिन्द्रा लिमिटेडसाठी**
**सही/-**
**दिव्या मस्करेन्हास**
**अंतरिम कंपनी सचिव**

**स्थळ : मुंबई**
**तारीख : २ जून, २०२५**